# प्रस्तावना

भारतीय प्रशासनाच्या व्यवस्थापनेमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या उगमातून एक नवीन अध्यायाची सुरुवात झालेली आहे. हे एक आपल्या देशाने नागरिकांच्या हितासाठी उचलेले क्रांतिकारी पाऊल आहे.

भारत सरकारने दि.१५/०६/२००५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मंजूर केला. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवून प्रत्यक्षात माहितीच्या अधिकाराचे अधिराज्य सुरु होऊन जनतेला माहिती मिळावी, हा या अधिनियमाचा उद्देश असल्याने त्याच्या कलम ४(१) (ब) मध्ये वेगवेगळया खात्यांच्या विविध हस्तपुस्तिका तयार केल्या आहेत.

त्यानुसार सर्वसामान्य जनतेला बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त (बाजार) खात्याविषयी माहिती देणे हे या हस्तपुस्तिकेचे उद्दिष्ट आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त (बाजार) खाते जनतेशी थेट संपर्कात येते. या खात्यामार्फत जनतेला सेवा दिली जाते. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील अनुसूची जज नुसार ''बाजार'' या संज्ञेत ज्या कोणत्याही जागेत सागुती, मासळी, फळे, भाजीपाला, मानवी खाद्य म्हणून असलेली जनावरे किंवा मानवी खाद्य म्हणून असलेले कोणतेही इतर पदार्थ यांची विक्री करण्याकरिता किंवा ते विक्रीसाठी मांडण्याकरिता लोक अशा जागेच्या मालकांच्या संमतीने किंवा संमतीवाचून जमतात त्या जागेचा समावेश होतो, मग तेथे खरेदीदार व विक्रेते एकत्र जमण्याबाबत कोणतेही सर्वसामान्य विनियमन असो वा नसो, तसेच अशा जागेच्या मालकाकडून किंवा कोणत्याही इतर व्यक्तीकडून बाजारात चालणाऱ्या व्यवसायावर किंवा तेथे येणाऱ्या व्यक्तींवर कोणतेही नियंत्रण ठेवण्यात येवो किंवा न येवो.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(१) (ब) मध्ये नमूद केलेल्या विषयाप्रमाणे हस्तपुस्तिकांमध्ये विविध माहिती देण्यात आली आहे. हस्तपुस्तिकांमधील माहिती जनतेला सर्वसाधारणपणे उपयुक्त ठरु शकेल.

हस्तपुस्तिकांमध्ये माहिती सुबोध भाषेत दिलेली आहे. तरीही कोणाला अधिक माहिती आवश्यक असल्यास सहाय्यक आयुक्त (बाजार) खात्यातील संबंधित अधिका-यांशी संपर्क साधून अधिनियमातील तरतूदीचे पालन करुन ती प्राप्त करुन घेता येईल.